CMYK

बुलढाण्यात आमदार सिद्धार्थ खरात यांचा जाहीर सत्कार व पदाधिकारी बैठक संपन्न
>> पान 2

महाराष्ट्र मराठा सोयरीकने सुरु केलेल्या वधू वर परिचय मेळावा लोक चळवळ होतेय
>> पान 3

भाजपा सदस्य अभियानाला जिल्ह्यात ऐतिहासिक प्रतिसाद
>> पान 4

**सुविचार**

अहंकार हा माणसाच्या प्रगतीचा मोठा शत्रू आहे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 145 ■ सोमवार, दि. 06 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## ‘मदत करणाऱ्यांनाही आम्ही सोडत नाही...’; धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचा प्रश्न अन् देवेंद्र फडणवीसांचे थेट उत्तर!

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराड यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. सध्या वाल्मिक कराड यांना चौकशीसाठी सीआयडी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांची चौकशी देखील सुरु आहे. पण हे वाल्मिक कराड राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचे आहेत. त्यामुळे विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची वारंवार मागणी केली जात आहे.

धनंजय मुंडेंच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील भाष्य केलं आहे. देवेंद्र फडणवीसांनी आज माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांना पत्रकारांनी धनजंय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर आरोपी कुठेही गेले असतील, कोणीही मदत केली असली तरी त्यांच्यावर कारवाई सुरु आहे हे दिसतंय. मदत करणाऱ्यांनाही आम्ही सोडत नाहीय. या प्रकरणाचा वापर राजकारणासाठी करु नये, सरपंचाची हत्या झाली आहे. त्या हत्येचं राजकारण होऊ नये, तर समाजात काहीतरी सुधार व्हावा... असा आमचा प्रयत्न आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.



मोर्चे काढण्याचा सगळ्यांना अधिकार आहे. पण बीड प्रकरणात सरकार आणि पोलीस पूर्ण शक्तीने कारवाई करतंय. काहीही झालं तरी कोणालाही वाचवण्याचा प्रयत्न झाला. तरी आम्ही तसं होऊ देणार नाही. जे कोणी दोषी आहेत आणि या प्रकरणाच्या अनुशंगाने दादागिरी हप्ते वसुली करणाऱ्यांवर जरब बसवयचं आम्ही ठरवलं आहे. त्याबाबत योग्य कारवाई सुरु आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली.

संतोष देशमुख प्रकरणात शासनाने नेमलेल्या एसआयटीमध्ये एक प्रमुख आयपीएस बाहेरील नेमला आहे. त्यांच्याखाली दिलेले अधिकारी हे वाल्मिक कराडचे पोलीस आहेत. यातील एक इएट्ट महेश विघ्ने पाहा. धनंजय मुंडे निवडून आल्यावरचा फोटो आहे. किती जवळचे अन प्रेमाचे संबध आहेत पाहा..हे असले अधिकारी वाल्मिकला शिक्षा देतील की मदत करतील? याच विघ्ने यांनी निवडणूक काळात धंनजय मुंडेचा कार्यकर्ता आसल्याप्रमाणे काम केलेले आहे. दुसरा मनोजकुमार वाघ हा वाल्मिक कराडचा आत्यंत खास माणुस आसून गेले १० वर्षे तो बीड एलसीबीमध्येच आहे आणि वाल्मिक कराडसाठी काम करतोय, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

## मतदारांपेक्षा वेश्या बऱ्या, आमदार संजय गायकवाड यांचे वादग्रस्त वक्तव्य




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महायुतीचे सरकार स्थापन होऊन काहीच महिने झालेले असताना शिवसेनेचे आमदारांच्या वादग्रस्त वक्तव्य पुढे आले आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी मतदारांची तुलना थेट वेश्याशी तुलना केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जयपूर येथे बोलताना ते म्हणाले की, दोन हजारात मतदार विकले गेले. विधानसभा निवडणुकीत त्यांना कमी मतदान झाल्याने त्यांनी संताप व्यक्त केल्याचं बोललं जात आहे. यावेळी त्यांनी मतदारांना शिव्या देत अवमानजनक शब्दांचा वापर देखील केला.

जयपूर येथे बोलताना संजय गायकवाड म्हणाले की, तुम्ही मला एक मत देऊ शकत नाही. तुम्हाला फक्त फक्त दारू, मटण, पाचशे रुपये पाहिजे. मतदार दोन दोन हजारात विकले, असं म्हणत त्यांनी मतदारांना शिवीगाळ केली. तसेच यांच्यापेक्षा वेश्या बऱ्या, असं आक्षेपार्ह वक्तव्य त्यांनी केलं. याचा एक व्हिडिओही समोर आला आहे. जो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ..

## नात्याला काळीमा! जन्मदात्यानेच केला लेकीवर लैंगिक अत्याचार

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतून नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक बातमी समोर आले आहे. एका जन्म दात्याने त्याच्या ३ वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा घृणास्पद प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नवी मुंबईच्या घणसोली रोड परिसरात घडली आहे. २६ डिसेंबर रोजी पीडित तीन वर्षीय मुलगी घरात एकटी असताना आरोपी पित्याने आपल्या पोटच्या मुलीसोबत अील आणि लैगिंक चाळे केले. नंतर जबरदस्तीने लैगिंक अत्याचार केला.

दरम्यान, पीडित मुलीची आई घरी परतल्यावर मुलीची अवस्था पाहता विचारपूस केल्यानंतर सर्व प्रकार उघडकीस आला. तसेच मागील अनेक दिवसांपासून हे काळं कृत्य आरोपी पिता करत असल्याचे समोर आले. यानंतर पीडित मुलीच्या आईने घृणास्पद कृत्याबद्दल नराधमाला जाब विचारला. परंतु यावेळी नराधमाने आईला शिवीगाळ करीत ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकारानंतर जाचला त्रासलेल्या महिलेने तातडीने रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार रबाळे पोलिसांनी अधिक तपास करीत आरोपी बापाविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. तसेच आरोपी बापाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

## कोयना धरण परिसर भूकंपाच्या सौम्य धक्क्याने हादरला, नव्या वर्षातील पहिल्या भूकंपाची झाली नोंद

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** कोयना धरण परिसर रविवारी सकाळी ६ वा.५६ मिनिटांनी भूकंपाच्या सौम्य धक्क्याने हादरला. या भूकंपाची तीव्रता २.४ रिश्टर स्केल एवढी नोंदली गेली आहे. नव्या वर्षात राज्यात झालेला हा पहिला भूकंप आहे. भूकंपामुळे कोयना धरणाला कोणताही धोका पोहोचला नसल्याचा निर्वाळा धरण व्यवस्थापनानं दिला आहे.

नव्या वर्षातील पहिला भूकंप– पाटण तालुका हा भूकंप प्रवण मानला जातो. या तालुक्यातील कोयना धरण परिसरात सातत्यानं भूकंपाचे लहान–मोठे धक्के जाणवतात. नवीन वर्षातही पहिला भूकंप कोयना धरण परिसरात झाला. रविवारी सकाळी ६ वाजून ५६ मिनिटांनी २.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या सौम्य धक्क्याने कोयना धरण परिसर हादरला.

भूकंपाचा केंद्रबिंदू ९ किमी अंतरावर– कोयना धरण परिसरात झालेल्या भूकंपाचा केंद्रबिंदू धरणापासून ९ किलो मीटर अंतरावर गोषटवाडी गावच्या हद्दीत होता. भूकंपाचा धक्का सौम्य असल्यानं तो केवळ कोयनानगर परिसरातच जाणवला. भूकंपामुळे कोयना धरणाला कोणताही धोका पोहोचला नसून धरण पूर्णपणे सुरक्षित असल्याचं धरण व्यवस्थापनानं सांगितलं.

धरणाची सुरक्षा होणार अधिक बळकट– भूकंपाचा काय परिणाम होतो, याचा अभ्यास करण्यासाठी कोयना धरणावर विशिष्ट स्वरूपाची यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे. या माध्यमातून धरणाची सुरक्षा अधिक बळकट होणार आहे. धरणाच्या तळाशी, मध्यभागी आणि वरील भागात ही उपकरणे बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे भूकंपाचा भूगर्भातील हालचालींवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करता येणार आहे.

भूकंप कसे होतात?पृथ्वी ही अनेक वेगवेगळ्या थरांनी बनलेली आहे. त्याच्या सर्वात वरच्या थराला क्रेस्ट म्हणतात. हा थर लहान मोठ्या तुकड्यांमध्ये विभागलेला असतो. जेव्हा हे तुकडे एकमेकांना धडकतात, तेव्हा दबावामधून घर्षण होते. त्यातून मोठमोठे खडक तुटतात. हे खडक तुटल्यानं उर्जा तयार होते. भूकंपाच्या लाटांद्वारे ती उर्जा एका क्षेत्रातून दुसऱ्या भागात गेल्यानंतर भूकंपाचे धक्के जाणवतात. भूकंप मोजण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणाला सिस्मोग्राफ म्हटले जाते. ही उपकरणे अनेक भागात खाजगी किंवा सरकारी संस्थांद्वारे बसवण्यात आली आहेत.

## वंजारी समाजाचा मुंडे बहीण–भावाकडून वापर, बीडमधून रोज धमक्या येतात–अंजली दमानिया

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात कारवाईची मागणी लावून धरणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषदेत धक्कादायक आरोप केले आहेत. मंत्री धनंजय मुंडे, पंकजा मुंडे आणि वाल्मिक कराडच्या कार्यकर्त्यांकडून धमक्या मिळत असल्याची त्यांनी माहिती दिली.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आपला मानसिक छळ सुरू असल्याची माहिती दिली. त्याबाबत भेटीसाठी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडं दमानिया यांनी वेळदेखील मागितली आहे.

काय म्हणाल्या अंजली दमानिया?– सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीडमधून सतत फोन येत असल्याची पत्रकार परिषदेत



माहिती दिली. त्या म्हणाल्या, '' धनंजय मुंडे, पंकजा मुंडे यांच्याकडून वंजारी समाजाचा वापर होतो आहे. माझा मानसिक छळ सुरू आहे. मी कधीही कुठल्याही समाजाविरोधात नव्हते. तुकाराम मुंडे यांच्यासारखे चांगले अधिकारीदेखील आहेत. मला भगवान बाबा नेहमीच आदरणीय आणि वंदनीय आहेत. मात्र, अख्खी फौज माझ्या मागं लावण्यात आली आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांकडून माझ्यावर सोशल मीडियात खालच्या दर्जातील टीका करण्यात येत आहे. नरेंद्र सांगळेकडून सतत फोन करण्यात येत आहे. त्याने सोशल मीडियात माझा नंबर शेअर केला आहे. सुनील फड या व्यक्तीने मॉरिशिअसमधील माझा फोटो टाकत अील लिहिले आहे. मला आलेल्या प्रत्येक फोनची चौकशी व्हावी. पहिल्या दिवशी सातशे ते आठशे कॉल आले होते''.

एसआयटी चौकशी म्हणजे धुळे–पुढे दमानिया यांनी म्हटले, '' बीडमधील बिंदू नामावलीची यादी राज्य सरकारनं जाहीर करावी, अशी माझी मागणी आहे. राज्य सरकारकडून सीआयडी आणि एसआयटी चौकशी म्हणजे केवळ धुळफेक सुरू आहे. वाल्मिक कराडला नमस्कार घालणारे पोलीस कसे चौकशी करणार? त्यामुळे या प्रकरणाची राज्याबाहेर चौकशी करावी. अन्यथा राज्यभरात आंदोलन करण्यात येणार आहे. मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल''.

## “सरकारच्या विरोधात कोणी आवाज केला तर त्याची हत्या...”, संजय राऊत यांचा खळबळजनक आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी आज (५ जाने.) पत्रकार परिषदेत बोलत असताना फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली. ''विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची घोषणा केंद्र सरकारनं केली. मात्र, अद्यापपर्यंत याबाबत जीआर निघाला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींपेक्षा राज्यातील भाजपानं या घोषणेचा मोठा ढोल बडवला. मात्र, अद्यापपर्यंत याबाबत जीआर निघाला नाही. हा एक निवडणुकीपूर्वीचा राजकीय जुमला होता का? केवळ मराठी माणसांच्या मतांसाठी त्यावेळी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची घोषणा केली होती का?'', असा सवालही संजय राऊत यांनी उपस्थित केलाय.



भ्रष्टाचारविरोधात आवाज उठवला की हत्या : पुढं राऊत म्हणाले, ''छत्तीसगडमध्ये मुकेश चंद्र नावाच्या पत्रकाराची हत्या करण्यात आली. त्यांनी भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला म्हणून त्यांची हत्या करण्यात आली. महाराष्ट्रातही अशीच परिस्थिती आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांनी भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला होता. त्त्यामुळे त्यांची हत्या करण्यात आली. जिथं–जिथं भाजपाचं राज्य आहे तिथं हा प्रकार घडतोय. मग तुम्ही लोकशाहीच्या कसल्या बाता मारता? ही कसली लोकशाही म्हणायची?'', असा संतप्त सवाल राऊतांनी केला. ''संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास निष्पक्षपातीपणे होत नाही. कारण, इथं असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक धनंजय मुंडे आणि 'आका' वाल्मिक कराड यांच्या आदेशानं झालीय. एसआयटीमधील अधिकाऱ्यांनी वाल्मिक कराड यांच्या गळ्यात गळा घालून फोटो काढल्याचा फोटो पाहिला. इतके चांगले संबंध असतील तर मग तपास निष्पक्षपाती कशा होणार? त्यामुळं या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत हे पोलीस स्टेशन बरखास्त केलं पाहिजे.

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात १५ दिवसांत १५ लाख भाविकांना महाप्रसाद

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** दत्त जयंतीपासून नाताळ, सलग शासकीय सुट्या, मार्गशीर्ष महिना आणि नववर्ष आरंभाचे औचित्य साधून अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळांनी भाविकांसाठी अविरतपणे महाप्रसादाची सेवा बजावली आहे. गेल्या १५ दिवसांत सुमारे १५ लाख भाविकांना महाप्रसादाचा लाभ घेण्यात आल्याची माहिती अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांनी दिली.



अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिराला लागून असलेले श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ३७ वर्षे अखंडपणे कार्यरत आहे. मंडळाचे संस्थापक–अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या अधिपत्याखाली सेवा कार्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात करण्यात आला आहे.

विस्तारित महाप्रसादालयासह यात्री निवास, भक्त निवास आदी स्वरूपात श्री स्वामी समर्थ भक्तांसाठी सेवासुविधा उपलब्ध असून या सेवाकार्याने प्रभावित होऊन गानकोकिळा, भारतरत्न लता मंगेशकर यांनी प्रभावित होऊन अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले यांना दोन अद्ययावत किमती मोटारी स्नेहापोटी दिल्या होत्या. त्यांच्या पश्चात मंगेशकर कुटुंबीयांनी अन्नछत्र मंडळाबरोबर जिव्हाळा जपला आहे. अन्नछत्र मंडळाने अलीकडे गोव्यातही सेवाविस्तार केला आहे.

## पावशेर दारू पिऊन धनंजय मुंडेंना अपमानित करण्याचे धाडस दाखवाल तर...; गुणरत्न सदावर्तेंचा जरांगेंवर जोरदार पलटवार

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा सर्वत्र निषेध व्यक्त होत आहे. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या, या मागणीसाठी शनिवारी परभणीत सर्वपक्षीय मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चातील सभेतून बोलताना मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना थेट इशारा दिला होता. धनंजय देशमुख किंवा त्यांच्या कुटुंबीयांना जर धक्का बसला तर घरात घुसून मारू. मी आतापर्यंत धनंजय मुंडे यांचं नाव घेतलं नाही, देशमुख कुटुंबीयांना जर त्रास झाला तर त्याला रस्त्यावर फिरू देणार नाही, असे त्यांनी म्हटले होते. आता यावरून वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय.

वकील गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, पावशेर दारू पिऊन जर कोणी धनजय मुंडे यांना अपमानित करण्याचे धाडस दाखवत असेल तर त्याची गय केली जाणार नाही. तुमच्या बापाचे रस्ते आहे का बे? शेतीला शेत असेल तरी वाट द्यावी लागते. जरांगे तुझं काय शिक्षण आहे? जरांगे, धस कोणीबी असो. मृत टाळूवरचं लोणी खात आहेत. एखाद्या मृत व्यक्तीचे राजकारण हे करत आहेत. आज पंकजा ताई आणि धनंजय मुंडे मंत्री दिसतात, ही बाबासाहेबांची देण आहे. जरांगे आणि धस तुम्ही सुपारीबाज आहात. मातमच्या जागी तुम्ही शिमग्यासारखं वागत आहात. धस आपण वैयक्तिक आयुष्यावर बोलू नये. आम्ही धस आणि पावशेरचे चालू देणार नाही, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केलाय.



सरपंच आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाने कायदा करून ठोस उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी तसेच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ राज्यातील ग्रामपंचायतीत ९ जानेवारीला काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत विचारले असता गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, हा देश मुगली नाही. ग्राम पंचायत बंद केल्याचा इशारा दिला तर सांगतो ते सरपंच बडतर्फ होतील, ते लोकसेवक आहेत. जे जे ग्रामपंचायत बंद करतील त्यांच्यावर बडतर्फची कारवाई करू. ही लोकसेवेची संविधानिक पदं आहेत. ती माज करण्यासाठी नाही. त्यामुळे ग्रामपंचायत बंद करू देणार नाही. मी न्यायालयात जाईल आणि डंके की चोट पे टाळे खोलू. असे त्यांनी म्हटले आहे.

CMYK

## आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे वृत्तपत्र सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्र्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणा पासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक वर्तमानपत्र होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या वर्तमानपत्राच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# बुलढाण्यात आमदार सिद्धार्थ खरात यांचा जाहीर सत्कार व पदाधिकारी बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मेहकर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचा जाहीर सत्काराचा कार्यक्रम व पदाधिकाऱ्यांची बैठक आज दिनांक ५जानेवारी २०२५ रोजी शेतकरी भवन कृषी उत्पन्न बाजार समिती बुलडाणा येथे संपर्क प्रमुख प्रा नरेंद्र खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, दिलीपराव वाघ, माजी जिल्हा परिषद सदस्य संजयभाऊ वडतकर,ड. संदीप गवई, ड. आकाश घोडे,वसंतराव भोजने, विधानसभा संपर्क प्रमुख राजेंद्र रावराणे, ड जयश्रीताई शेळके, महीला आघाडी जिल्हा प्रमुख चंदाताई बढे, जिल्हा संघटक प्रा डी एस लहाने , डॉ गोपाल बच्छिरे, जिल्हा समन्वयक संदीप दादा शेळके , युवासेना जिल्हा प्रमुख नंदु कऱ्हाडे, शुभम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.







मेहकर विधानसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचा बुलडाणा जिल्हा शिवसेनेतर्फे जाहीर सत्कार करण्यात आला. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाने खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने, नव्या जोशाने कामाला लागावे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहे. त्या अनुषंगाने पक्ष संघटन मजबूत करणे, सदस्य नोंदणी करणे इत्यादी विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या २३ जानेवारी रोजी होणाऱ्या जयंती निमित्त प्रत्येक पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी करावी असे आवाहन मान्यवरांनी यावेळी उपस्थितांना केले.

या कार्यक्रमाला उप जिल्हा प्रमुख सुनील घाटे, बद्री बोडखे, प्रा.आशिष रहाटे, तुकाराम काळपांडे, तालुका प्रमुख लखन गाडेकर, विजय इंगळे, किसन धोंडगे, महेंद्र पाटील, दादाराव खार्डे, दिपक मापारी, गजानन वाघ, दिपक चांभारे, ईश्र्वर पांडव, श्रीराम खेलदार, शहर प्रमुख गजानन ठोसर, रमेश ताडे, भीमराव पाटील,, संजय वडतकर, दिलीप वाघ, वासुदेव बंडे पाटील, अशोक गव्हाणे, गजानन उबरहंडे, विजय इतवारे, गणेश पालकर, एकनाथ कोरडे, आशिष खरात, प्रा सिद्धेश्र्वर आंधळे, तसेच शिवसेना, युवासेना सेना, महीला आघाडी, सर्व अंगीकृत संघटनांचे जिल्हा प्रमुख , उप जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, उप तालुका प्रमुख, विभाग प्रमुख शाखा प्रमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

## संतोष देशमुखांची हत्या करुन गुजरातला पळाले; पैसे संपताच सुदर्शन घुले अन् सुधीर सांगळेने मुंबई-पुणे गाठले!

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडमधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांच्याकडून नवी माहिती उघड झाली आहे. देशमुख यांची हत्या केल्यानंतर सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे हे गुजरातला गेले होते.

सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली. यानंतर प्रकरणातील आरोपी फरार झाले. यात प्रमुख सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांनी थेट गुजरात गाठले.. गुजरात मध्ये पैसे संपल्यानंतर त्यांनी मुंबई गाठली नंतर पुण्यात आले. शुक्रवारी रात्री सुदर्शन घुले याच्याशी संबंधित डॉक्टर संभाजी वायभसेला चौकशीसाठी ताब्यात घेतले असता घुलेने एका मित्राला फोन केला. या कॉल लोकेशन वरून त्याला पोलिसांनी घेण्यात अटक केली. गुजरात मध्ये या दोघांनी नेमका आश्रय कुठे घेतला? याचा तपास देखील केला जात आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळेला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडने ३१ डिसेंबर रोजी सीआयडीला सरेंडर केलं होतं. त्यानंतर अनेक दिवासांपासून फरार असलेले सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळेला शुक्रवारी (०३ जानेवारी) ताब्यात घेण्यात आले.

आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी-

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी ताब्यात घेण्यात आलेल्या सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि सिद्धार्थ सोनवणे या तीनही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी देण्यात आली आहे. केज न्यायालयाचे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी एस व्ही पावसकर यांनी ही शिक्षा सुनावली आहे. या तीनही आरोपींना २५ दिवसांनंतर अटक करण्यात आली आहे. फरार असलेला मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह सुधीर सांगळेच्या मुसक्या एसआयटीच्या पथकाने बालेवाडीत आवळल्या. अद्याप या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे मात्र फरार आहे.

## बाळ होत नसल्यानेच उच्चशिक्षित महिलेने चक्क केली बाळाची चोरी, पोलीस तपासात धक्कादायक माहिती उघड

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्हा रुग्णालय विविध कारणांनी नेहमीच चर्चेत असते. मात्र जिल्हा रुग्णालय आता एक वेगळ्या प्रकरणाने पुन्हा चर्चेत आले आहे. रुग्णालयातून शनिवारी पाच दिवसांचे बाळ चोरी झाल्याची घटना घडली. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.नाशिक जिल्हा रुग्णालयात सुमन खान या महिलेची प्रसूती झाली. मात्र त्यानंतर या महिलेवर सपना मराठे नामक महिलेने दोन दिवसांपासून रेकी केली आणि खान दाम्पत्याचा विश्वास संपादन केला. सपना मराठे ही महिला या खान दाम्पत्यासोबतच जिल्हा रुग्णालयात राहत होती. बाळाला सांभाळते असे सांगून शानिवारी दुपारी ती महिला नवजात बाळ घेऊन पसार झाली.

## यांनी बीडचा बिहार नाही तर हमास, तालिबान केला, जोपर्यंत संतोषचे मारेकरी फासावर जात नाहीत तोपर्यंत मनात राग ठेवा : सुरेश धस

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून मी यांच्या विरोधात बोलतोय असे नाही. जर तसे असेल तर मी शांत बसतो, घाना देशात राहून जातो पण तुम्ही संतोष देशमुखला परत आणाल का? त्याच्या कुटुंबीयांना न्याय द्याल का? असा सवाल भाजपचे आमदार सुरेश धस यांनी विचारला. जोपर्यंत संतोष देशमुखचे मारेकरी फासावर जात नाही तोपर्यंत मनात राग ठेवा असे आवाहन त्यांनी केले. तसेच बीडचा बिहार नाही तर यांनी हमास आणि तालीबान करून ठेवलाय अशी जहरी टीका सुरेश धस यांनी केली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी पुण्यामध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली.

संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्यांनी बीडचा बिहार नाही तर हमास, काबुलीस्तान आणि तालिबान केला असल्याची टीका सुरेश धस यांनी केली. ते म्हणाले की, ''माझा रंगही काळा आहे. तुम्ही म्हणाल तर घाना देशात जाऊन राहतो. पण मग संतोष देशमुखला परत आणू शकाल का? संतोष देशमुख तिसऱ्यांदा सरपंच झाला. पण अजून त्याच्या कुटुंबीयांना राहायला घर नाही. त्यांना न्याय मिळाले पाहिजे, यात कसलं राजकारण आहे?''

मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायचा नसेल तर त्यांना बिनखात्याचा मंत्री करा अशी मागणी सुरेश धस यांनी केली. या आधी अनेकांनी राजीनामा दिले. आर आर पाटील, विलासराव देशमुख यांनाही राजीनामा द्यावा लागला होता. महायुतीच्या तीनही पक्षाच्या नेत्यांना विनंती करतो. यांचा राजीनामा घ्या, आमच्या मुलाला न्याय द्या अशी मागणी त्यांनी केली. सुरेश धस म्हणाले की, मी अजितदादावर टीका केली नाही. पण यांनी घेरा घातलाय त्यांना. ते लायकवान माणसं नाहीत. अजित दादा डोळे उघडून खाली बघा काय सुरू आहे ते. बारामती मतदारसंघातील तुमच्या विश्वासातली माणसे बीड जिल्ह्यात पाठवा म्हणजे सत्यता समोर येईल. तो सूरज चव्हाण माझ्यावर बोलला. अरे तो अजून बालवाडीतही नाही. तुम्ही काय बोलायचं ते बोला, मी तुमच्याकडे लक्ष द्यायचं नाही. मला संतोष देशमुख प्रकरणावरून लक्ष हटवायचं नाही. फक्त मराठा समाज नाही तर संपूर्ण जातीपाती या संतोष देशमुख यांच्यासोबत आहेत. वंजारी समाजातील काही लोक सोडली तर सगळ्यांना ही गोष्ट पटली नाही. तुम्ही जाती-जातीत का अंतर पाडताय? एखादी जात आम्ही टार्गेट करत नाही. त्या जातीतील चुकीचे नेतृत्व करत आहेत त्यांना सोडायचं नाही असं सुरेश धस म्हणाले.










DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महाराष्ट्र मराठा सोयरीकने सुरू केलेल्या वधू वर परिचय मेळावा लोक चळवळ होतेय

- सुनील जवंजाळ संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र मराठा सोयरीक
- ३५ वा मराठा वधू वर परिचय मेळावा बुलढाण्यात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** वधु आणि वरांना यशोचित जीवनसाथी निवडण्याच्या दृष्टिकोनातून सकल मराठा समाजाने सुरू केलेल्या वधु वर परिचय मेळाव्याला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त होत आहे असे प्रतिपादन सुनील जवंजाळ यांनी केले..

सकल मराठा समाजाच्यावतीने बुलढाणा येथील गर्दी वाचनालयाच्या सभागृहामध्ये महाराष्ट्र मराठा सोयरीक उपक्रमांतर्गत वधु वर परिचय मेळाव्याचे आयोजन ५ जानेवारीला करण्यात आलं होतं यावेळी मार्गदर्शन करताना सुनील जवंजाळ बोलत होते ते पुढे म्हणाले की आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रत्येक पालकांना आपल्या पाल्य चांगलं उच्च शिक्षीत झाला पाहीजे अशी अपेक्षा असते शिक्षण घेतांना मुलांच वय वाढत जातं अशावेळी मुलीचं लग्न करताना तिच्या शिक्षणा योग्य वर मिळणे तिला अपेक्षित असतं तर वय झाल्यामुळे वडिलाला मुलीला शोभेल असा वर शोधण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो अशा परिस्थितीत त्यांना मदत व्हावी या दृष्टिकोनातूनच २०१६ पासून आपण छोट्या प्रमाणात वधू-वर परिचय मेळाव्याच्या कार्यक्रमाला सुरुवात केली.






आता हा कार्यक्रम व्यापक होत चालला असून मराठा समाजातील सर्व पोटजातीचा समावेश महाराष्ट्र मराठा सोयरीक उपक्रमात करण्यात आला आहे असेही सुनिल जवजांळ यांनी सांगितले बुलढाणा येथे ३५ वा वधु वर परिचय मेळावा संपन्न होत असल्याचे सांगत या मेळाव्याच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी ही महिलांनी घेतल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेखा सोमनाथ सावळे तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मीनल आंबेकर यांनी केलं यावेळी प्रास्तविकातून मराठा समाजा अंतर्गत येणाऱ्या सर्व पोट जातीतील घटकांना एकत्र करत मराठा समाजात एकत्र बांधण्याचा काम महाराष्ट्र मराठा सोयरीकच्या माध्यमातून केल्या जात असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन सौ अरुणा चव्हाण संजीवनी शेळके यांनी केलं कार्यक्रमादरम्यान वधूवरांनी आपला परिचय उपस्थितांना करून दिला या वधुवर परिचय मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सुनिल रामराव शेळके,नारायणराव मिसाळ , अरविंद बापू देशमुख, दिनकरराव बावस्कर ,अशोकराव चौधरी, कडाळे साहेब,, श्री गणेशराव पांडे, श्री सागर पवार,प्राचार्य डॉ. अण्णासाहेब म्हळसणे, भगवान राव कानडजे ,श्री मंगेश मोगल, सुनील सपकाळ , डॉ.पुरुषोत्तम देवकर, लक्ष्मण ठाकरे, ,श्री सुरेश देवकर ,शिवाजीराव तायडे, श्रीकृष्ण जेऊघाले, प्रा रामदास शिंगणे , प्रा गणेश कड, म्हस्के साहेब, सुभाषराव देवकर, गजानन पाटोळे, ॲड विजय सावळे,रमेश काळे,डॉ विनोद जवरे, डॉ मधुकर देवकर, डॉ शोन चिंचोले,प्रकाश काळवाघे, डॉ विक्रम घुले,गणेशराव निकम ,कैलास राऊत, प्रभाकर पाटील काळवाघे ,रमेश बुरकुल, रमेश भोंडे, शिवाजीराव तायडे , माधवराव जपे,डॉ.सत्येंद्र भुसारी, प्रल्हादराव ताठे,नंदूभाऊ सवडतकर , पंढरी सुसर, माधवराव शेळके, भालचंद्र देशमुख, राजेश गायकवाड साहेब, विजय शिरसाट विजयसिंह राजपूत,मीनलताई आंबेकर , डॉ उषाताई खेडेकर , डॉ संजीवनी शेळके, मालिनी सवडतकर, वैशाली म्हस्के,ज्योतीताई पाटील, मालतीताई शेळके ,सुरेखाताई सावळे, तनुजा आडवे , वंदनाताई चव्हाण , चारुशिला पाटील , प्रतिभा भोंडे, प्रतिभा भुतेकर, किरण भोंडे,आशा राजे जाधव, उषा उगले, मंगलाताई पाटील यांनी परिश्रम घेतले.

# १० व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे १५ ते १९ जानेवारी दरम्यान आयोजन; कशी असेल कार्यक्रमाची रुपरेषा?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवर्णाया दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, १५ जानेवारी ते रविवार, १९ जानेवारी २०२५ या दरम्यान हा महोत्सव पीव्हीआर-आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे.




नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. डेलीहंट डिजीटल पार्टनर आहेत. सॉलीटेअर टॉवर्स हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे ॲकॅडमीक पार्टनर तर एमजीएम रेडिओ एफएम ९०.८ हे रेडिओ पार्टनर आहेत.

अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आयोजनामागील उद्देश

आजपर्यंतचे जागतिक दर्जाचे सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचावेत, चित्रपट दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कलावंत व युवा पिढीतील सिनेमाची आवड असर्णाया कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळून कला व तांत्रिक पातळीवर चित्रपटाचे रसग्रहण होत चित्रपट जाणिवा अधिक सशक्त व समृद्ध व्हाव्यात, मराठवाडा व छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपटाच्या निर्मितीच्या अंगाने सांस्कृतिक केंद्र म्हणून व प्रोडक्शन हब म्हणून जागतिक पातळीवर पोहोचावे, छत्रपती संभाजीनगर शहरातील पर्यटन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यटकांपर्यंत पोहोचावे, मराठवाडा विभागातील गुणवंत कलावंतांना चित्रपट दिग्दर्शक, चित्रपट विषयातील तज्ज्ञ व तंत्रज्ञांपर्यंत पोहोचता यावे, त्यांच्यासोबत संवाद साधता यावा तसेच आताचा मराठी सिनेमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचावा, हा या महोत्सव आयोजनामागे उद्देश आहे.

भारतीय सिनेमा स्पर्धा

महोत्सवाच्या पाच दिवसांच्या कालावधीत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. महोत्सवात मागील वर्षाप्रमाणे भारतीय स्पर्धा गटाचा समावेश करण्यात आलेला आहे. यात विविध भारतीय भाषांतील नऊ सिनेमांचा समावेश असून पाच राष्ट्रीय पातळीवरील ज्युरी हे प्रेक्षकांसह चित्रपट पाहणार आहेत. यातील सर्वोत्त्कृष्ट भारतीय चित्रपटाला सुवर्ण कैलास पारितोषिक आणि एक लक्ष रूपये देण्यात येणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट कलाकार (स्त्रीपुरुष) या वैयक्तिक पारितोषिकांचा देखील समावेश असणार आहे.

भारतीय सिनेमा स्पर्धा गट ज्युरी समितीच्या अध्यक्षा ज्येष्ठ अभिनेत्री सीमा बिस्वास (गुवाहाटी) या असणार आहे. तर ज्युरी सदस्य म्हणून ज्येष्ठ छायाचित्रकार सी. के. मुरलीधरन (मुंबई), ज्येष्ठ संकलक दिपा भाटीया (मुंबई), ज्येष्ठ दिग्दर्शक जो बेबी (कोचीन) आणि ज्येष्ठ पटकथा लेखक आणि अभिनेते गिरीश जोशी (मुंबई) हे मान्यवर असणार आहेत.

फिप्रेसी ही चित्रपट समीक्षकांची आंतरराष्ट्रीय संघटना आहे. फिप्रेसी भारत हे जगभरातील महोत्सवांमधून उत्तम चित्रपट निवडून त्यांना पुरस्कार प्रदान करतात. त्या पुरस्कारांना आंतरराष्ट्रीय सन्मान मानला जातो. त्यांचे तीन विशेष ज्युरी महोत्सवातील आताच्या पिढीतील ज्या दिग्दर्शकांच्या कारकिर्दीतील पहिले अथवा द्वितीय सिनेमे असणार आहेत, त्यांचे विशेष परीक्षण करणार आहेत. या समितीचे ज्युरी अध्यक्ष ज्येष्ठ लेखिका व चित्रपट समीक्षक लतिका पाडगांवकर व शीलादित्य सेन (पश्चिम बंगाल), जी. पी. रामचंद्रन (केरळ) हे मान्यवर या समितीत सदस्य असणार आहेत.

कालिया मर्दन विशेष प्रदर्शन, उद्घाटन सोहळा आणि जीवन गौरव पुरस्कार

महोत्सवाच्या दशकपूर्ती वर्षाच्या निमित्ताने आयोजन समितीच्या वतीने रसिकांना एका विशेष कार्यक्रमाची भेट दिली जाणार आहे. भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिध्द मुकपट 'कालिया मर्दन' याचे विशेष प्रदर्शन उद्घाटन सोहळ्याआधी संपन्न होणार आहे. शंभर वर्षापूर्वीचे मुकपट सिनेगृहात प्रत्यक्ष संगीताद्वारे (लाईव्ह ऑर्केस्ट्रा) दाखविले जात. तोच अनुभव रसिकांना मिळावा म्हणून कालिया मर्दन हा मुकपट कोलकाता येथील 'सतब्दीर सब्द' या वाद्यवृंद समूहातर्फे सादरीकरणाद्वारे दाखविला जाणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या रूक्मीणी सभागृहात बुधवारी, दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सायं. ५ वा. या मुकपटाचे प्रदर्शन करण्यात येईल. कालिया मर्दन विशेष प्रदर्शन व उद्घाटन सोहळ्यासाठी सर्वांसाठी प्रवेश खुला असेल.

यानंतर लगेचच याच ठिकाणी चित्रपट महोत्सवाचा उद्घाटन सोहळा बुधवारी, दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता रूक्मीणी सभागृह, एमजीएम परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची उपस्थिती असणार आहे. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार प्रसिध्द व ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या व चित्रपट दिग्दर्शिका पद्मभूषण सई परांजपे यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य योगदानाबद्दल सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून एनएफडीसीचे महाव्यवस्थापक डी. रामाकृष्णन, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, प्रोझोनचे सेंटर डायरेक्टर व वरिष्ठ उपाध्यक्ष कमल आर. सोनी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री ९ वा. पीव्हीआर-आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे यावर्षीची जागतिक पातळीवरील नावाजलेली फ्रेंच आणि तामिळ भाषेतील फिल्म 'लिटील जाफना' फेस्टिव्हलची ओपनिंग फिल्म म्हणून प्रदर्शित केली जाणार आहे. उद्घाटन सोहळ्यानंतर पुढील चार दिवस महोत्सव पीव्हीआर-आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होईल.

समारोप सोहळा

फेस्टिव्हलचा समारोप सोहळा रविवार, १९ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता पीव्हीआर आयनॉक्स प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे. सुप्रसिध्द नृत्य व चित्रपट दिग्दर्शिका फराह खान, ऑस्कर विजेते साउंड डिझायनर रसूल पुक्कुट्टी आणि आयोजन समितीचे मानद अध्यक्ष प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप सोहळा संपन्न होईल. सुवर्ण कैलास पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समारोपाची फिल्म म्हणून यंदाच्या ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीतील महत्वपूर्ण फिल्म 'द सीड ऑफ सॅक्रेड फिग' (पर्शियन) दाखविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची रुपरेषा

महोत्सवाच्या पाच दिवसांच्या कालावधीत पीव्हीआर आयनॉक्स प्रोझोन मॉल येथे चित्रपट प्रदर्शनांबरोबरच विविध भरगच्च कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. गुरुवार, १६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता पानसिंग तोमर, हासिल, साहब बीबी और गँगस्टर यांसारखे अनेक महत्वपूर्ण सिनेमांचे दिग्दर्शक तिग्मांशू धुलिया यांच्या मास्टर क्लासचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक ज्ञानेश झोटींग हे त्यांच्याशी संवाद साधतील.

गुरूवार, १६ जानेवारी २०२५ रोजी सायं ६ वाजता प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची 'स्वदेसची वीस वर्षे...' ही प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आलेली आहे. प्रसिध्द नाट्य व चित्रपट दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी हे त्यांच्याशी संवाद साधतील. शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता 'ओटीटी माध्यमांवरील बदलता सिनेमा' या विषयावर परीसंवादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. विविध भारतीय भाषांमधील महत्वपूर्ण चित्रपट दिग्दर्शकांचा यात सहभाग राहील.

शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ रोजी सायं. ६ वाजता 'मराठी भाषा अभिजात दर्जा आणि मराठी चित्रपट' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये लेखिका लतिका पाडगांवकर, प्रसिध्द अभिनेते सुबोध भावे, लेखक क्षितिज पटवर्धन, चित्रपट महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय सांवलकर, प्रसिध्द दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांचा सहभाग असणार आहे. महोत्सव संचालक सुनील सुकथनकर या चर्चेचे संवादक असतील.

शनिवार, १८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता 'आधुनिक सिनेमातील तंत्र भाषा' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये ऑस्कर विजेते साउंड डिझायनर रसूल पुक्कुट्टी, ज्येष्ठ छायाचित्रकार सी. के. मुरलीधरन, ज्येष्ठ संकलक दिपा भाटीया, ज्येष्ठ दिग्दर्शक जो बेबी यांचा सहभाग असणार आहे. प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक जयप्रद देसाई हे या चर्चेचे संवादक असतील.

शनिवार, १८ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता भारतीय सिनेमा स्पर्धा गटातील चित्रपट दिग्दर्शकांसमवेत चर्चा आयोजित करण्यात आलेली आहे.

रविवार, १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता इंडिया फोकस या चित्रपट विभागातील दिग्दर्शकांसमवेत चर्चा आयोजित करण्यात आलेली आहे.

रविवार, १९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता हिंदी सिनेमांमधील प्रसिध्द नृत्य व चित्रपट दिग्दर्शिका फराह खान यांच्या मास्टरक्लासचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक जयप्रद देसाई हे त्यांच्याशी संवाद साधतील.

मराठवाडा शॉर्ट फिल्म स्पर्धा

महोत्सवाच्या निमित्ताने मराठवाड्यातील लघुपट निर्मिती कर्णाया कलाकारांसाठी शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेला मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद लाभला. स्पर्धेतील अंतिम फेरीसाठी निवडलेल्या पाच शॉर्ट फिल्म महोत्सवादरम्यान दाखविण्यात येतील. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्मला विशेष पारितोषिक व रोख २५,००० रूपये देऊन गौरविण्यात येणार आहे.

चित्रपट रसग्रहण कार्यशाळा

चित्रपट महोत्सवामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा याकरिता छत्रपती संभाजीनगर शहरात पंचवीस महाविद्यालयांमध्ये चित्रपट रसग्रहण कार्यशाळांचे आयोजन चित्रपट समीक्षकांच्या उपस्थितीत ६ ते १४ जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात आले आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेर्णाया या महोत्सवात रसिकांनी भरभरून सहभाग नोंदवावा, असं आवाहन महोत्सवाचे संस्थापक आणि संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, डॉ. अपर्णा कक्कड, आकाश कागलीवाल, डॉ. आशिष गाडेकर, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत, क्रियेटिव्ह डायरेक्टर जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटींग आदींनी केले आहे.

## महत्त्वाचे...

### देवेंद्र फडणवीस म्हणाले, तक्रार असेल तर पोलिसांकडे द्या, आता अंजली दमानिया म्हणतात, आतापर्यंत काय आम्ही चकाट्या पिटत होतो का?



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्यांकडून आपला प्रचंड मानसिक छळ होत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. बीड जिल्ह्यातून अनेकांचे धमकीचे फोन येत आहेत. मला चार दिवसांपासून फोन येत आहेत. पहिल्या दिवशी ७००-८०० कॉल आले, फोन अजून बंद झालेले नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंजली दमानिया यांची काही तक्रार असेल तर त्यांनी पोलिसांकडे द्यावी, असे वक्तव्य केले. आता अंजली दमानिया यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर पलटवार केलाय.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना संतोष देशमुख प्रकरणाच्या हत्येच्या निषेधार्थ बीड, परभणी आणि पुण्यात मोर्चा निघाला आहे. तर अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते माझा छळ करत असल्याचा आरोप केलाय, याबाबत विचारले असता मोर्चे काढण्याचा सगळ्यांना अधिकार आहे. बीड प्रकरणात सरकार आणि पोलीस पूर्ण शक्तीने कारवाई करत आहेत. काहीही झाले तरी या प्रकरणात कोणी कोणाला वाचवण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही कोणालाही वाचवू देणार नाही. या प्रकरणात कोणालाही वाचवले जाणार नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने जे लोक दादागिरी आणि हफ्ते वसुली करतात, असा सगळ्यांवर आम्ही जरब बसवण्याचे ठरवले आहे. त्यामुळे या संदर्भात योग्य कारवाई सुरु आहे. अंजली दमानिया यांची काहीही तक्रार असेल तर त्यांनी ती पोलिसांकडे द्यावी, पोलीस यावर निश्चित कारवाई करतील, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

यानंतर अंजली दमानिया यांनी पलटवार केलाय. त्यांनी म्हटलेय की, मुख्यमंत्री आम्हाला आता म्हणत आहेत पोलिसांकडे जा, अरे आतापर्यंत काय आम्ही चकाट्या पिटत होतो का? असा सवाल त्यांनी उपस्थित केलाय. मी डीजींना मॅसेज केला, मुख्यमंत्री फडणवीस तुम्हाला देखील मॅसेज केलाय. मी मॅसेज देवेंद्र फडणवीस यांना पाठवला आहे, त्यांना एक कॉल करता येत नाही का? पोलिसांना सगळे डिटेल्स दिले आहेत. मात्र तरीही कारवाई नाही केली, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

### सालगडी असणारे अधिकारी एसआयटीमध्ये, वाल्मिक ज्या गाडीत आला ती गाडी ताब्यात का घेतली नाही? बजरंग सोनवणेंचा हल्लाबोल



**मुंबई/प्रतिनिधी :** ''वाल्मिक कराडला जी गाडी घेऊन आली ती ताब्यात का घेतली नाही? जो त्याला गाडीमध्ये घेऊन आला त्याला ताब्यात का नाही घेतले? एवढ्या दिवसांमध्ये ते कोणा कोणाला भेटले कोणी कोणी त्यांना मदत केली त्या सगळ्यांना सहआरोपी करा. एसआयटी लावली पण त्यातले अधिकारी कोण आहेत? त्यांना खुर्चीवर कोणी बसवलेय हे पण तपासा. सालगडी असणारे अधिकारी एसआयटीमध्ये नेमण्यात आले आहेत'', असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते, खासदार बजरंग सोनवणे म्हणाले. ते पुण्यातील आंदोलनात बोलत होते.

संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झाली पाहिजे; बजरंग सोनवणे

बजरंग सोनवणे म्हणाले, नऊ तारखेला अपहरण करून संतोष देशमुख यांच्या हत्या केली. हा मोर्चा कुठल्याही पक्षाचा जातीचा नाही तर मानवतावादी आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झाली पाहिजे. सरकारला जोपर्यंत फाशी द्यायची सद्बुद्धी देत नाही तोपर्यंत मोर्चे सुरू राहणार..बीडमध्ये आता जीवन जगणं मुश्किल झाल आहे. वाल्याचा वाल्मिक झाला पण याचा आणि अलीबाबा चाळीस चोर झालाय.

हत्यामागे जो मास्टरमाईंड आहे, त्याला पहिल्यांदा पकडा तो खंडणीखोर : बजरंग सोनवणे

पुढे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले, या हत्यामागे जो मास्टरमाईंड आहे, त्याला पहिल्यांदा पकडा तो खंडणीखोर आहे. मी राजकारण करायला या मोर्चामध्ये सहभागी नाही. सरकार म्हणून तुमच्या जबाबदारी आहे. सरेंडर झालेला आरोपी नेमका पकडला की सरेंडर झाला. पोलिसांनी जर का खरच त्यांना पकडला असेल तर त्यांचा कौतुक आहे. पण वाल्मिक कराड सरेंडर झाला की हे दोघे कसे सरेंडर झाले. देशपांडे नावाचे सरकारी वकील केस घ्यायला घाबरले. कारण यांची दादागिरी गुंडगिरी आणि दडपशाही आहे. काल एक अधिकारी म्हणाला की जर त्यांनी पत्रकार परिषद घेतली तर माझी चड्डी राहणार नाही. माझी विनम्र विनंती आहे की तू एकदा प्रेस घे..तुला विविध ठिकाणी पोस्टिंग मिळण्याबाबत कोणाची मेहरबानी आहे. येणाऱ्या दोन दिवसांमध्ये समजून जाईल.

## विविध वृत्त...

### जिथून नवजात बालक पळवले तिथंच आता महिलेने गळ्याला दोरी लावली; नाशिक जिल्हा रुग्णालयाची लक्तरे वेशीवर टांगली

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** एक ना अनेक संशयास्पद घटनांच्या केंद्रस्थानी असणाऱ्या जिल्हा शासकीय रुग्णालयात शनिवारी एका महिलेने पाच दिवसांचे बाळ पळवल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच रविवारी पुन्हा एक धक्कादायक घटना जिल्हा शासकीय रुग्णालयात उघडकीस आली आहे. रुग्णालयाच्या आवारात एका महिलेने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या आवारात एक महिलेने गळफास घेत आत्महत्या केली आहे. रुग्णालयाच्या आवारातील झाडाला गळफास घेत महिलेने स्वत:चे आयुष्य संपवलं आहे. कविता अहीवळे असे महिलेचे नाव आहे. महिलेने गळफास घेतल्यानंतर रुग्णालयाच्या आवारात एकच खळबळ उडाली. महिलेने आत्महत्या का केली? यामागील कारण अद्याप अस्पष्ट आहे.

नाशिक जिल्हा रुग्णालय पुन्हा चर्चेत

घटनेची माहिती मिळताच पोलीस नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल झाले आहेत. सरकारवाडा पोलिसांकडून महिलेच्या मृतदेहाचा पंचनामा सुरु आहे. बाळ चोरीला गेल्याची घटना ताजी असतानाच अवघ्या काही तासातच नाशिक जिल्हा रुग्णालय पुन्हा चर्चेत आले आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाची सुरक्षा व्यवस्था वाऱ्यावर असल्याचे पाहायला मिळत आहे.

नाशिक जिल्हा रुग्णालयातून पाच दिवसांच्या बाळाची चोरी

दरम्यान, जिल्हा शासकीय रुग्णालयात शनिवारी धक्कादायक घटना उघड होती. पाच दिवसांपूर्वी जन्मलेल्या बाळाच्या मातेशी ओळख वाढवत संशयित महिलेने ऐन डिस्चार्जच्या वेळी मातेच्या डोळ्यांदेखत बाळ चोरी करून पळ काढला होता. महिलेचे हे कृत्य काही सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. यानंतर पोलिसांनी चौकशी करुन बाळाचा व महिलेचा शोध सुरु केला होता. हे बाळ शोधण्यात नाशिक पोलिसांना यश आले असून चोरी गेलेलं बाळ अवघ्या काही तासात पोलिसांनी आईच्या कुशीत पोहोचवले आहे.

### आधी सत्कार सोहळ्याला अनुपस्थिती, चर्चा झाल्यानंतर आता राम शिंदेंचा जंगी सत्कार करणार असल्याचे भाजप आमदारांकडून जाहीर

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** पक्षाच्या महामेळाव्याचे नियोजन करण्यासाठी शिर्डीतील बैठकीला जावे लागल्याने राम शिंदे यांच्या सत्कार सोहळ्याला उपस्थित राहता आले नसल्याचा सूर आता भाजपच्या आमदारांनी लावला आहे. पण आता ही कसर भरून काढू आणि महायुतीच्या वतीने राम शिंदे यांचा सत्कार करू असे आमदार विक्रम पाचपुते यांनी जाहीर केलं. विधानपरिषदेच्या सभापतीपदी राम शिंदे यांची निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर शहरात शिंदे यांचा सर्वपक्षीय सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र त्या सत्कार सोहळ्याला भाजपच्याच नेत्यांचीच अनुपस्थित असल्याने त्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

याबाबत भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांनी प्रतिक्रिया दिली. शिर्डी येथे भाजपच्या होणाऱ्या महामेळाव्याच्या नियोजन बैठकीसाठी जावे लागल्याने शिंदेंच्या सत्कार सोहळ्याला येता आले नाही असे कर्डिले यांनी सांगितले. तर भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी आपण खासगी घरगुती कार्यक्रमासाठी बाहेरगावी असल्याने सत्कार सोहळ्याला उपस्थित राहता आले नाही असे सांगितले. मात्र ही कसर भरून काढू आणि महायुतीच्या वतीने शिंदेंचा स्वतंत्र सत्कार सोहळा आयोजित केला जाईल असे त्यांनी सांगितले.

भाजपच्या आमदारांचीच अनुपस्थिती

अहिल्यानगर शहरातील माऊली सभागृहात राम शिंदे यांचा शनिवारी सर्वपक्षीय सत्कार सोहळा पार पडला. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे होते. तर पोपटराव पवार, आ. सत्यजित तांबे, आ. हेमंत ओगले यांच्यासह अनेक नेते या सत्कार सोहळ्याला उपस्थित होते. पण जिल्ह्यातील भाजपचे आमदार मात्र या सोहळ्याला उपस्थित नसल्याने त्याची जोरदार चर्चा सुरू झाली.

मंत्री राधाकृष्ण विखे, आमदार शिवाजी कर्डीले, आमदार मोनिका राजळे यांची या सत्कार सोहळ्याला उपस्थिती लावली नाही.

# भाजपा सदस्य अभियानाला जिल्ह्यात ऐतिहासिक प्रतिसाद

दर्यापूर विधानसभेत डॉ.अनिल बोंडे यांच्या बुथला भेटी
भाजपचे सदस्य होण्याच आवाहन
उमरी, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी येथे जनप्रबोधनाचे कार्यक्रम



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** भाजपने संघटनात्मक दृष्ट्या उभारी घेण्यासाठी मोठ्या हालचाली सुरू केल्याचं दिसून येत आहे. संघटन पर्वा अंतर्गत अमरावती जिल्ह्यात भाजप सदस्य अभियानाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. खासदार तथा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात १४ ही तालुक्यात हे अभियान व्यापकपणे राबविल्या जात आहे. त्या अंतर्गत बोंडे यांनी दर्यापूर विधानसभा क्षेत्रातील विविध बूथ स्तरावर भेटी देत भाजपच सदस्य होण्याचे आवाहन केले आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडताच भाजपने संघटनात्मक दृष्ट्या पक्षाला मजबूत करण्यासाठी युद्ध स्तरावर पाऊल उचलली आहेत. त्यानुसार अमरावती जिल्ह्यात भाजप सदस्य अभियानाला थाटात सुरुवात झालेली आहे. जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्ह्यातील १४ ही तालुक्यात भाजप सदस्यता मोहीम युद्धस्थरावर सुरू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत आज डॉ. अनिल बोंडे यांनी दर्यापूर विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या उमरी मंदिर, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी यासह विविध ठिकाणी बूथ स्तरावर भेटी दिल्या. दरम्यान जनप्रबोधनाचे विविध कार्यक्रम घेण्यात आले. समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देणारा एकमेव पक्ष म्हणून भाजप पक्ष आहे. त्यामुळे राष्ट्राच्या, देशाच्या आणि राज्याच्या उन्नतीसाठी भाजपच हा उत्तम पर्याय आहे असा आशावाद व्यक्त करताना डॉ. अनिल बोंडे यांनी प्रत्येकाने भाजपच सदस्यत्व घ्यावं असे आवाहन केले.

### विशेष सदस्यत्व अभियान, १४ ही तालुक्यात अभियानाचा झंजावात


विशेष म्हणजे पाच जानेवारीला भाजप तर्फे जिल्ह्यात विशेष भाजप सदस्यता अभियान आयोजित करण्यात आले होते. त्या अंतर्गत डॉ.अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात संपूर्ण जिल्हा कार्यकारणीने चौदाही तालुक्यात गावच्या गाव पिंजून काढताना पाहायला मिळले. दर्यापूर तालुक्यातील उमरी येथे झालेल्या कार्यक्रमाला तालुकाध्यक्ष मदन पाटील बायस्कार, नकुल सोनटक्के, पंकज कान्हेरकर, गोपाल ठोसरे, रूपराव पाटिल फलके, श्रीकृष्ण दीगड़े, साहेबराव पोटे बाबाराव बचे, देवीदास डामरे, नंदूशेठ लोहिया, मुरलीधर गोळे, गोपाल डालके हरिहर वडतकर, बलिराम माहुलकार उपस्थित होते. तर अंजनगाव सुर्जी येथे झालेल्या कार्यक्रमाला शहराध्यक्ष उमेश भोंडे, महामंत्री डॉ विलास कविटकर, प्रफुल्ल होरे, विनायक पाटील, मनोहर मुरकुटे, मनोज श्रीवास्तव, संतोष वर्मा, आशिष टिपरे, प्रवीण पटुकले, विक्रम पाठक, रतन भास्कर, राजेश बांगर, रामसिंग सोळंके, दिनेश भावे, मनीष मेन, विनोद दुर्गे, संजय टिपरे, गोपाल नाठे, दिनेश भोंडे, सुनिता मुरकुटे, हेमा लेंधे, विद्या गडेकर, गौरव चांदुरकर, सौरव जुनघरे, रितिक शर्मा उपस्थित होते.

### आशा मनीषा मंदिर येथे विशेष ड्राईव्ह

दर्यापूर विधानसभेत येणाऱ्या अनेक बुथवर खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी भेटी देत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तसेच भाजपशी नवीन कार्यकर्त्यांना जोडण्याचे आवाहन केलं. त्यानुसार दर्यापूर येथील आशा मनीषा मंदिरावर भाजपने सदस्यत्व नोंदणीचा विशेष ड्राईव्ह देखील घेतला. यावेळी तालुकाध्यक्ष मदन पाटील बायस्कर, शहराध्यक्ष रवींद्र ढोकणे, रवी राजपूत, अमोल धोटे, निलेश पारडे, भारत शुक्ला, मेघा भारती, मीराताई कावनपुरे, रितू शर्मा, भाग्यश्री राजपूत, भूषण विल्हेकर आदी उपस्थित होते.

## सावरकरांनंतर आता नरेंद्र दाभोलकरांच्या नावासाठी आग्रह; उद्घाटनीय स्थळाला नाव देण्याची 'अंनिस'ची मागणी

**नागपूर/प्रतिनिधी :** २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या एका प्रवेशद्वाराला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आता विज्ञान भवनातील उद्घाटनीय स्थळाला दिवंगत विचारवंत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे नाव देण्यात यावे, अशा मागणीचे पत्र महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुणे शहर शाखेने साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे यांना पाठवले आहे.



अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पत्रानुसार, साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीतील विज्ञान भवनात होणार आहे आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर हे आग्रही विज्ञानवादी होते. दाभोलकरांनी लिहिलेली १२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच साने गुरुजींनी सुरू केलेल्या साधना या साप्ताहिकाचे ते अनेक वर्ष संपादक होते.

समाजाला विवेकशील करण्यात दाभोळकरांचे मोठे योगदान आहे. त्यांचे हे सर्व समाजाभिमुख कार्य लक्षात घेता साहित्य संमेलनाच्या विज्ञान भवनातील उद्घाटनीय स्थळाला डॉ. दाभोलकरांचे नाव देणे सर्वाथाने योग्य ठरेल, असेही या पत्राद्वारे समितीच्या राज्य कार्यकारणीचे सल्लागार सदस्य श्रीपाल ललवाणी, पुणे शहर कार्याध्यक्ष अनिल वेल्हाळ यांनी महामंडळाचे लक्ष वेधले आहे. सोबतच महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनाही यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शरद पवारांनाही साकडे

अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी दाभोलकरांनी आयुष्यभर लोकप्रबोधन केले. महाराष्ट्र जादूटोणाविरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे, यासाठी मोठा लढा उभारला आणि अखेर समाजहितासाठी लढता–लढता ते शहीद झाले. एक विज्ञानवादी मराठी माणूस म्हणून दाभोलकरांचा देशपातळीवर मोठा लौकिक होता. त्यामुळे राष्ट्रीय राजधानीत होणाऱ्या या संमेलनाच्या उद्घाटनीय स्थळाला दाभोलकरांचे नाव देण्यासाठी स्वागताध्यक्ष म्हणून आपण स्वत: पुढाकार घ्यावा, अशी विनंती 'अंनिस'ने शरद पवार यांना पत्राद्वारे केली आहे.

# अजितदादा डोळे उघडून खाली बघा काय सुरु आहे, बारामतीमधील तुमचा विश्वासू बीडला पाठवा, सत्य समोर येईल; सुरेश धसांचा हल्लाबोल सुरुच

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात केली, या प्रकरणाचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई व्हावी यासाठी मागणी केली जात आहे. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी राज्यभरातून होत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चाचं आयोजन करण्यात येत आहे. आज पुण्यात आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलं आहे. या मोर्चाला सर्वपक्षीय नेत्यांसोबतच संतोष देशमुख यांचं कुटुंब देखील उपस्थित आहे. यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांचं कौतुक करत अजित पवार खूप प्रांजळ मनाचा माणूस आहे, अजित पवार कधीच चुकीच्या लोकांना पाठीशी घालणार नाहीत, अजित पवारांचं धनंजय मुंडे जवळ काय अडकलं आहे, असा सवाल त्यांनी भर सभेमध्ये उपस्थित केला आहे. त्याचबरोबर त्यांना मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केलीय.

अजितदादा तुझ्या पाया पडतो...!

माझी आत्ताच विनंती आहे. पुणे जिथे काय होणे, अशा ऐतिहासिक शहरांमधून मी मागणी करतोय. मायबाप सरकारने, देवेंद्र फडणवीस यांना विनंती करतो, अजितदादा यांना विनंती करतो, त्याला मंत्रीमंडळात ठेवू नये. अजितदादा फार प्रांजळ मनाचा माणूस आहे. पाच वर्षाच्या लेकरासारखं अजित दादाचा हृदय आहे आणि तो कधीच चुकीच्या लोकांना पाठीशी घालत नाही. मी त्यांच्यासोबत होतो. त्यामुळे मला माहिती आहे. मी काही लोकांना घेऊन गेलतो. त्यांना म्हटलं यांच्या बाबतीत फोन करा. अजितदादा तेव्हा मला म्हणाले हे चुकीचे वागणारे लोक आहेत. मी यांच्या चुकीच्या बाबतीत फोन करणार नाही. एक वेळा नाही, दोन वेळा नाही, तर तब्बल दहा वेळा हे माझ्या बाबतीत घडलं आहे. मी राष्ट्रवादी २००५ पासून २०१७ पर्यत होतो, जवळजवळ दहा–बारा वर्ष मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होतो. त्यांच्याबरोबर मी काम केलं. अजितदादा असा नव्हता. अजितदादा मी तुमच्या पाया पडतो, तुझं काय अडकले रे यांच्यापाशी असं म्हणत सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे

मी चॅलेंज देतो राजकारण सोडून देईल

अजित दादा तुमचं यांच्याकडे काय अडकले आहे. यांना बाहेर जाऊ दे, अरे बाबा सातपुडा सरकारी बंगल्यावर बैठका घेत असतील आणि ही बैठक जर चुकीची निघाली तर मी चॅलेंज देतो. राजकारण सोडून देईल. माझ्याकडे ३०० गाईंचा गोठा आहे. १००० गाईंचा गोठा करेल. दोन तीनशे म्हशी देखील आणेन. मी राजकारणात राहणार नाही, पण अजित पवार, एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही सर्वांनी मिळून या गोष्टीचा छडा लावा. या गोष्टी जर खऱ्या असतील तर काही दिवस जोपर्यंत या केसचा निकाल लागत नाही, तोपर्यंत त्याला बाहेर काढा. आमची मागणी आहे. सरकारच्या बाहेर त्यांना ठेवा. त्यांच्याकडून राजीनामा घ्यायचा नसेल तर त्यांना बिन खात्याचा





मंत्री करा. सगळ्यात सोपं राजीनामा द्यायला सांगा. या देशांमध्ये लालबहादूर शास्त्री यांनी रेल्वेचा एक अपघात झाला म्हणून त्यांनी राजीनामा दिला. निलंगेकरांच्या मुलीचे मार्क मागे–पुढे केले मुख्यमंत्रीपद गमावू लागलं, आर आर पाटलांना एका शब्दामुळे घरी जावं लागलं, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार तुमच्या सर्वांच्या पाया पडतो. तुम्हाला तुम्हाला विनंती करतो. याचा राजीनामा घ्या. इतकी चौकशी होऊ द्या, आमच्या लेकराला न्याय मिळू द्या, अशी मागणी यावेळी सुरेश धस यांनी केली आहे.

बीडचा हमास केला. बीडचा तालिबान केला. या लोकांचं वागणं बर नाही. अजित पवारांवर मी टीका केली नव्हती, का लावून घेत आहात. मी अकरा वर्ष त्यांच्यासोबत काम केलं. अजित पवारांना घेरा घातला. अजित दादा डोळे उघडून खाली बघा काय सुरू आहे ते, बारामती मतदारसंघातील तुमच्या विश्वासातली माणसे बीड जिल्ह्यात पाठवा म्हणजे सत्यता समोर येई, असं आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे.

## महायुतीत दरी निर्माण झाली तर त्याला आमदार सुरेश धसच जबाबदार राहतील; अमोल मिटकरींचा पुन्हा हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** महायुतीत दरी निर्माण झाली तर त्याला भाजप आमदार सुरेश धसच जबाबदार राहतील, असे विधान अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी केलेय. मुख्यमंत्र्यांनी कान टोचल्यावरही सुरेश धस कसे बोलतायेत?, असा सवालही त्यांनी यावेळी केलाय. अमोल मिटकरी यांनी कालच्या परभणीतल्या मोर्चातील सुरेश धस यांच्या भाषणावरही टीका केलीय. अजित पवारांवरची टीका आम्ही सहन करणार नसल्याचा इशारा त्यांनी यावेळी सुरेश धसांना दिलाय.

दरम्यान मस्साजोग प्रकरणात संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केलीय. सुरेश धसांना आता मुख्यमंत्र्यांनीच आवर घालावा, अशी मागणी त्यांनी केलीये. तर या प्रकरणात संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांऐवजी विरोधक धनंजय मुंडे यांना जाणीवपूर्वक लक्ष्य करीत असल्याचा आरोप त्यांनी केलाय. दरम्यान, आपल्याला सुरेश धसांच्या कार्यकर्त्यांकडून जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचा गंभीर आरोप यावेळी अमोल मिटकरी यांनी केलाय. देवेंद्र फडणवीसजी आपल्या पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी काल परभणी मधील मुक मोर्चात 'क्या हुआ तेरा वादा अजितदादा' अशा प्रकारे वक्तव्य करून आदरणीय अजितदादांविषयी जी गरळ ओकली त्याबद्दल आपण त्यांना जाब विचारणार, की त्यांचा बेभान सुटलेला बैल आणखी मोकाट सोडणार? असा सवाल करत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरींनी जाब विचारला आहे. आमदार अमोल मिटकरींनी एक्सवर पोस्ट करत हा प्रश्न विचारला आहे. परिणामी भाजपचे आमदार सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर केलेल्या टीकेनंतर आता राष्ट्रवादी आक्रमक झाली झाली असून आमदार सुरेश धस यांची दखल घेण्याचे आवाहन राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून करण्यात येत असल्याचे बघायला मिळत आहे. तर दुसरीकडे याचं मुद्यावरून आमदार सुरेश धसांना परत एकदा अमोल मिटकरींवर तोफ डागली आहे.

नेमकं काय म्हणाले होते सुरेश धस?

ज्या पद्धतीने यांनी संतोषला मारले ती कोणती पद्धती आहे? छत्रपती संभाजीराजेंच्या हत्येप्रमाणेच ही हत्या झाली आहे. त्या लेकराने काय बिघडवले होते? आकाचे आका करलो, जल्दी तयारी, हम निकले है जेलवारी, असा जोरदार हल्लाबोल भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केलाय. तर अजित दादा क्या हुआ तेरा वादा, काय को इसको अंदर लिया? असे म्हणत त्यांनी धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळातील समावेशावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ काल (४ जानेवारी) परभणीत सर्वपक्षीय मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाच्या सभेतून सुरेश धस बोलत होते.

